तरुण भारत
Apla Nagpur | 2022-02-02 | Page- 5
epaper.tarunbharat.net

# जनकल्याणकारी समितीस आरोग्ययान प्रदान

## गुरुवारी लोकार्पण सोहळा

◆ नागपूर, १ फेब्रुवारी

जनकल्याणकारी समितीच्या विविध ग्रामसंकुलातील गावांमधील गावकऱ्यांच्या आरोग्यविषयक गरजा लक्षात घेता फिरत्या चिकित्सालयाची आवश्यकता होती. ही गरज लक्षात घेता पुण्याच्या 'क्विक होल फाऊंडेशन'च्या वतीने जनकल्याणकारी समितीस आरोग्ययान (रुग्णवाहिका) प्रदान केले आहे. या आरोग्ययानाचा रीतसर लोकार्पण सोहळा गुरुवार ३ फेब्रुवारी रोजी भीवगड ग्रामसंकुलातील खैरी (बुटी) येथे आयोजिण्यात आला आहे.

याप्रसंगी क्विक होल फाऊंडेशनच्या अध्यक्षा अनुपमा काटकर प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या हस्ते जनकल्याणकारी समितीला हे आरोग्ययान देण्यात येणार आहे. जनकल्याणकारी समितीच्या वतीने उमरेड तालुक्यातील मुरादपूर, भीवगड व उमरेड या ग्रामसंकुलात व हिंगणा तालुक्यातील ग्राम संकुलातील एकूण २६ गावांमध्ये सर्वांगीण ग्रामविकासाचे कार्य चालते. या आरोग्ययानाच्या माध्यमातून जवळपास आठ हजार नागरिकांपर्यंत आरोग्यसेवा पोहोचणार आहे. खापरीच्या स्वामी विवेकानंद मेडिकल मिशन तज्ज्ञ



वैद्यकीय अधिकारी व परिचारिकांच्या सेवेद्वारे या आरोग्ययानासोबत जोडले जाणार आहेत. विवेकानंद मेडिकल मिशनच्या सहकार्याने जनकल्याणकारी समितीच्या २५ आरोग्यसेविका सध्या कार्यरत आहेत. या आरोग्ययानामुळे नागपूरच्या जवळ असूनही दुर्गम आदिवासी लोकांना दिलासा मिळणार आहे.

◀ *(तभा वृत्तसेवा)*